## करोना नियंत्रणाच्या उपाययोजनाची दखल; प्रतिबंधात्मक उपाययोजना बाबतची माहिती

# सफाळे पॅटर्न 'पंचायत राज' पुस्तकात

लोकसत्ता वार्ताहर

**पालघर :** ग्रामपंचायतीसह सामाजिक-राजकीय कार्यकर्ते तसेच स्थानिक आरोग्य व पोलीस प्रशासन यांच्या सूक्ष्म नियोजनामुळे करोनाच्या महामारीमध्ये अनेक स्तरांवर युद्धपातळीवर काम करून सफाळे पॅटर्न नावाने केलेल्या उपाययोजनांची दखल केंद्र सरकारने घेतली असून केंद्र सरकारच्या पंचायत राज पुस्तकामध्ये पालघर तालुक्यातील सफाळे उंबरपाडा या ग्रामपंचायतीचा समावेश करण्यात आला आहे. बेस्ट प्रॅक्टिस टू फाईट covid-rz अंतर्गत राज्यातील काही ग्रामपंचायतीचा पंचायत राज, माझे सरकार या पुस्तिकेत समावेश आहे.



गेल्या दोन वर्षांपासून करोनाने थैमान घातले असताना ग्रामपंचायतींनी त्यावर केलेल्या प्रतिबंधात्मक उपाययोजनाबाबतची विविध माहिती या पुस्तिकेत देण्यात आली आहे. यामध्ये सफाळे उंबरपाडा ग्रामपंचायतीने राबवलेल्या सफाळे पॅटर्नचाही उल्लेख करण्यात आला आहे. करोनाकाळामध्ये ग्रामपंचायतीची पदाधिकारी कार्यकारिणी, स्थानिक आरोग्य प्रशासन, पोलीस प्रशासन, पंचक्रोशीतील सामाजिक राजकीय कार्यकर्ते यांच्यामार्फत या ग्रामपंचायतीअंतर्गत विलगीकरण केंद्र उभारणे, प्राधान्यक्रमाने ४५ वर्षांवरील नागरिकांचे लसीकरण, प्राथमिक आरोग्य केंद्रांमध्ये प्रतिजन चाचणी, संसर्गग्रस्त व्यक्तींना मोफत औषधोपचार, प्राथमिक टप्प्यात रुग्ण शोधमोहीम अशा अनेक मोहि[म] ग्रामपंचायतीमार्फत प्राधान्या[ने] राबविली गेल्या.

ग्रामपंचायतीच्या प्रशासकी[य] बाबींचे नियोजन ग्रामविका[स] अधिकारी यांनी केले, त[र] ग्रामपंचायत हद्दीतील प्राथमि[क] आरोग्य केंद्राचे आरोग्य अधिका[री] यांनी आरोग्यविषयक बाबी[चे] नियोजन करून करोना नियंत्रणा[त] आणण्यासाठी प्रयत्न केले. याचबरोबरीने सफाळे पोलीस ठा[णे] हद्दीमध्ये कायदा-सुव्यवस्था राखण्यासाठी सफाळे पोली[स] ठाण्याचे पोलीस अधिकारी कर्मचारी यांनीही विशेष प्रयत्न केल्याचे यामध्ये सांगितले गे[ले] आहे.

### विविध उपाययोजनांमुळे रुग्णसंख्येवर नियंत्रण

- या प्रशासनाबरोबर आरोग्य यंत्रणा, पोलीस यंत्रणेला मदत म्हणून सामाजिक कार्यकर्ते व राजकीय कार्यकर्ते यांनी सर्व मतभेद विसरून सामाजिक जाणीव यातून एकत्र येत करोना नियंत्रणासाठी एकत्रित प्रयत्न केल्यामुळे सफाळे पॅटर्न यशस्वी झाला.
- या पॅटर्नचा उल्लेख केंद्र सरकारच्या 'पंचायत राज', 'माझे सरकार' या पुस्तकात केल्यामुळे सफाळे उंबरपाडा या ग्रामपंचायतीकडे आदर्श ग्रामपंचायत म्हणून पाहिले जात आहे.
- सफाळे पॅटर्नमध्ये विविध उपाययोजना केल्यामुळे रुग्णसंख्येवर नियंत्रण मिळवता आले आहे. त्यामुळे केंद्र सरकारने या पॅटर्नची दखल घेतली गेली आहे.